# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**अपंग व जेष्ठ नागरीकांना एस.टी. प्रवासात सवलत देण्यासाठी आधार कार्डाची सक्ती न करण्याबाबत**

**(१) १७६०३ (०६-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) गाड्यांमध्ये अपंग व जेष्ठ नागरीकांसाठी दिली जाणारी सवलत कोणताही अधिकृत आदेश नसताना वाहकांकडून सवलत प्रमाणपत्र धारकांना आधार कार्डची सक्ती केली जात आहे. मात्र आधार कार्ड नसल्याने त्यांना या सवलतीपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे मार्च, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपंग व जेष्ठ नागरीकांना एस.टी. प्रवासात सवलत देण्यासाठी आधार कार्डाची सक्ती न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०७-२०१६) :** (१) राज्य परिवहन महामंडळाच्या सवलती उपभोगण्याकरिता आधारकार्ड सक्तीचे राहील अशा आशयाची बातमी दै.लोकसत्ता, दि.१९/२/२०१५ व दि.२६.०२.२०१५ मध्ये प्रसिध्द झाली होती. त्यामुळे अनेक नागरिकांच्या लोकप्रतिनिधी व जेष्ठ नागरिकांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्था यांच्या तक्रारी आल्या आहेत.

(२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमधून ६५ वर्षावरील जेष्ठ नागरिकांना निवडणूक आयुक्त/तहसिलदार/राज्य सरकार/केंद्र सरकार यांच्या ओळख पत्राच्या आधारे सवलत देण्यात येते. तथापि, राज्य परिवहन महामंडळाद्वारा केलेल्या तपासणीमध्ये जानेवरी, २०१५ पर्यात ३९६३ अवैध जेष्ठ नागरिक आढळल्याने उक्त ओळखपत्राच्या विधीग्राह्यतेबाबत आक्षेप उपस्थित करुन दिनांक १०.०२.२०१४ च्या शासन निर्णयाप्रमाणे सामाजिक न्याय विभागास आधारकार्ड अनिवार्य करुन उचित आदेश निर्गमित करण्याबाबत राज्य परिवहन

महामंडळाद्वारा दिनांक २७.०२.२०१५ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली होती. तथापि, उक्त विभागाद्वारा याबाबत कोणतेही आदेश/निर्णय निर्गमित करण्यात आलेले नाही. त्यामुळे जेष्ठ नागरिकांकरिता यापुढे एस.टी.च्या सवलती उपभोगण्याकरीता आधार कार्ड सक्तीचे राहील, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत व त्याप्रमाणे दिनांक ०८.०४.२०१५ रोजी सभागृहात निवेदनही करण्यात आलेले आहे.

दरम्यान, दिनांक २५.०२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात येवून सवलत योजनेबाबतची बांधिलकी गृह (परिवहन) विभागाकडे देण्यात आलेली आहे.

त्यानुसार उक्त सवलत योजनांचा आढावा घेण्याकरीता दिनांक ०३.०५.२०१६ च्या शासन निर्णयान्वये रोजी राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्य परिवहन सेवेच्या सवलत घेणेकरीता आधार कार्ड अनिवार्य करण्याबाबतची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथे परिवहन कार्यालय सुरू करण्याबाबत**

**(२) १९००९ (०६-०८-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे परिवहन कार्यालय सुरू करण्याची मागणी मा.परिवहन मंत्री, प्रधान सचिव परिवहन विभाग यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार उल्हासनगर शहरात परिवहन कार्यालय सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०७-२०१६) :**(१) होय.

(२) राज्यामध्ये भविष्यकाळात नवीन प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याकरिता निकषांची तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी परिवहन आयुक्त यांच्या स्तरावर दिनांक ११.०२.२०१६ च्या आदेशान्वये अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उदगीर जिल्हा लातूर येथे उपप्रादेशिक (आर.टी.ओ.) परिवहन कार्यालय मंजूर करण्याबाबत**

**(३) ३१४७६ (२०-०१-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर जिल्हा लातूर येथे उपप्रादेशिक (आर.टी.ओ.) परिवहन कार्यालय मंजूर करण्यात यावे यासाठी लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१५ वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपप्रादेशिक कार्यालय सुरु करण्यासाठी व स्वतंत्र आर.टी.ओ.पासींग नंबर देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०७-२०१६) :**(१) होय, उदगीर जिल्हा-लातूर येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी डिसेंबर, २०१४ मध्ये शासनाकडे मागणी केली आहे.
(२) राज्यामध्ये भविष्यकाळात नवीन प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याकरिता निकषांची तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी परिवहन आयुक्त यांच्या स्तरावर दिनांक ११.०२.२०१६ च्या आदेशान्वये अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव शहरातील म.न.पा बस सेवा सुरु करण्याबाबत**

**(४) ३६८६० (१८-०१-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव शहरात यापूर्वी एस.टी. बससेवा मनपा बससेवा वेगवेगळया विभागात सुरु होती परंतु गेल्या काही दिवसांपासून ती बदं करण्यात आल्याने नागरिकांचे हाल होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बससेवा तातडीने सुरु करुन नागरिकांना व विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मनपा आयुक्त व परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ही बससेवा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०७-२०१६) :**(१), (२) व (३) सन १९९० पासून जळगांव ते उत्तर महाराष्ट्र महाराष्ट्र विद्यापीठ या मार्गावर राज्य परिवहन महामंडळामार्फत ४ नियतांद्वारे परतीच्या फेऱ्या चालनात होत्या. त्यानंतर दि.१.७.२००५ पासून राज्य परिवहन महामंडळामार्फत चालनात असलेली बससेवा बंद करुन जळगांव महानगरपालिकेमार्फत शहर बससेवा प्रत्यक्षात दि.१५.८.२००९ पासून अभिकर्ता नियुक्त करुन सुरु करण्यात आली. जळगांव महानगरपालिका शहर बससेवा खाजगी अभिकर्त्यांने काही अडचणीस्तव दि.५.११.२०१४ पासून बंद केली आहे. मा. विधानसभा सदस्य, जळगांव शहर यांनी दिलेल्या दि.१७.११.२०१४ च्या निवेदनानुसार

जळगांव शहर बसस्थानक ते उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि केंद्रीय विद्यालय जळगांव या मार्गावर दिनांक १२.०१.२०१५ पासून जळगांव आगारामार्फत जाता येता १२ राज्य परिवहन बसफेऱ्या सुरु करण्यात येऊन त्या चालनात आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील चारही कृषीविद्यापिठांचे कुलगूरु पदावर परप्रांतीयांची निवड करण्यात आल्याबाबत.**

**(५) ३९७०८ (२८-०४-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राहुरी, परभणी, दापोली व अकोला येथी कृषी विद्यापीठांच्या कुलगुरुपदी परप्रांतीय व्यक्तींची निवड केल्याची बाब माहे जानेवारी २०१६ च्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय.
(२) असल्यास, परराज्यातील कुलगुरूंच्या नियुक्त्या रद्द करून राज्यातील मान्यवरांना संधी देण्यात यावी, अशी मागणी राज्यातील विविध संघटनांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी २०१६ च्या पहिल्या आठवडयात केली आहे, हे सुध्दा खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती राज्यातील कृषी विद्यापीठाच्या कुलगुरु पदी राज्यातील मान्यवरांना संधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०७-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३), (४) व (५) महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम १९८३ च्या कलम १७, पोटकलम (१) व (२) येथे कृषी विद्यापीठाच्या कुलगुरुंच्या निवडीबाबतची कार्यपध्दती नमूद करण्यात आली आहे. कायद्यातील सदर तरतूदीनुसार कार्यवाही करुन मा.कुलपती तथा राज्यपाल यांच्याकडून राज्यातील कृषी विद्यापीठाच्या कुलगुरुंची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

---

**एस.टी महामंडळातर्फे सुरु करण्यात आलेल्या आरामदायी एसी बस चे भाडे प्रवाशांच्या अवाक्याबाहेर असल्याबाबत**

**(६) ३९८६१ (२८-०४-२०१६). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी बससेवांशी स्पर्धा आणि प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी एस टी महामंडळातर्फे स्कॅनिया कंपनीच्या मल्टी एक्सेस बसेस विकत घेण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बसेसना अश्वमेध नाव देवून मुंबई ते हैदराबाद या मार्गावर रुपये १७३४ या दराने आरामदायी बससेवेचा शुभारंभ करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सेवेचे भाडे खाजगी बससेवेच्या भाड्यापेक्षा ५०० रुपये अधिक असल्याने प्रवाशांनी या एस.टी महामंडळाच्या सेवेकडे पाठ फिरवली असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एस.टी महामंडळाच्या प्रवाशांना आरामदायी सेवा देणा-या या नव्या उपक्रमांकडे प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी आणि प्रवासाचे भाडे कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०७-२०१६) :**(१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांची गरज ओळखून मुंबई-हैद्राबाद या मार्गावर वातानुकूलित "अश्वमेध" (मल्टी एक्सेल) बस सेवा दिनांक १४.०१.२०१६ रोज सुरु करण्यात आली. परंतू, सदर बस सेवेस प्रवाशांचा अल्प प्रतिसाद मिळाल्याच्या कारणास्तव सदर बस फेरी दिनांक १७.०३.२०१६ रोजी बंद करण्यात आली.
(४) राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवाशांना आकर्षित करुन घेण्यासाठी "शिवशाही" या प्रकारातील आरामदायी, वातानुकूलित सेवा किफायतशीर दरात प्रवाशांना उपलब्ध करुन देण्याकरीता ५०० बसेस भाडेतत्वावर घेवून चालविण्याचा निर्णय राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर घेण्यात आला आहे. त्यानुसार निविदा प्रक्रिया करुन परवानाधारकास राज्य परिवहन महामंडळाद्वारा कार्यादेश देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**घाटमाथा (ता.पाटण) येथे घाटमाथा ते कोयना अशी एस.टी. किंवा मिनीबस सुरू करुन विदयार्थ्यांची गैरसोय दूर करण्याबाबत**

**(७) ४१४३१ (२८-०४-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटमाथा (ता.पाटण) परिसरातील अनेक शालेय विदयार्थ्यांना एस.टी.ची सुविधा नसल्याने विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून नेचल, ता.पाटण येथील शाळेत जाण्यासाठी सुमारे ५ किलोमीटर याप्रमाणे रोज १० किलोमीटर पायपीट करावी लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती शाळेच्या वेळेत घाटमाथा ते कोयना अशी एस.टी. किंवा मिनीबस सुरू करून विदयार्थ्यांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०७-२०१६) :**(१) नाही.

(२) व (३) राज्य परिवहन पाटण आगारामार्फत कोयना नगर ते घाटमाथा १०.३०, ११.००, १०.०५, ११.३० या वेळेस मिडी बसच्या फेऱ्या चालनात आहेत. तसेच उंब्रज-घाटमाथा ०५.३०, ०७.४५ व कराड-चिपळूण १७.५०, ०७.०० अशा ४ फेऱ्या चालनात आहेत. सदर फेऱ्यांचा लाभ नेचल व घाटमाथा परिसरातील विद्यार्थी व प्रवाशी घेत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली व माधवनगर येथे सुसज्ज मध्यवर्ती बसस्थानक व बसडेपो उभारणेबाबत**

**(८) ४१५८७ (२८-०४-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १४ शहरामध्ये नवीन सुसज्ज बसस्थानके व डेपो उभारणीचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये सांगली व माधवनगर येथे सुसज्ज बसस्थानक व बस डेपो उभारणीचा ही समावेश आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सांगली व माधवनगर येथे सुसज्ज बसस्थानक व बस डेपो उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०७-२०१६) :**(१) राज्यातील १३ शहरामध्ये आधुनिक बस तळ उभारण्याचा निर्णय राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर घेण्यात आलेला आहे.

(२) होय.

(३) सांगली व माधवनगर येथील बसस्थानकासह राज्यातील एकूण १३ ठिकाणच्या अद्ययावत बसस्थानकांची उभारणी करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाद्वारा तज्ञ सल्लागार संस्थेची निवड करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यात जामखेड-कर्जत रस्त्यावरुन जाणाऱ्या एस.टी. बसेस सोतापूर-निंबोडी गावात विद्यार्थीनीसाठी थांबविणेबाबत**

**(९) ४३७९५ (२८-०४-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात जामखेड-कर्जत रस्त्यावरुन धावणाऱ्या परिवहन मंडळाच्या बसेस सोतपूर-निंबोडी गावातून जाणाऱ्या बसेस थांबत नसल्याने त्यांना माहीजवळगांव येथे

शिक्षणासाठी जाण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण झाल्या असून प्रवासाअभावी विद्यार्थीनीचे शिक्षण अर्ध्यावर सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती जामखेड-कर्जत रस्त्यावरुन जाणाऱ्या महामंडळाच्या एस.टी.बसेस सोतपूर-निंबोडी गावातील बस स्टॉपवर थांबविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०७-२०१६) :**(१) नाही.

(२) व (३) निंबोडी गाव हे जामखेड-कर्जत मार्गावर मुख्य रस्त्यालगत असून जामखेड-कर्जत मार्गावर सकाळी ०६.३० ते १८.०० या कालावधीत सितपूर फाटा व निबोडी फाटा मार्गे राज्य परिवहन जामखेड आगाराच्या जाणाऱ्या व येणाऱ्या २० फेऱ्या उपलब्ध असून सदर सेवेचा माहीजळगांव येथे शिक्षण घेणारे विद्यार्थी लाभ घेतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात ठिंबक सिंचनाचे क्षेत्र वाढवून पाणी टंचाईवर मात करणे, पाण्याचे प्रदूषण कमी करणे या योजनेला दिलेला निधी परत न जाण्याबाबत**

**(१०) ४४७०३ (२८-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ठिंबक सिंचनाचे क्षेत्र वाढवून पाणी टंचाईवर मात करणे, पाण्याचे प्रदूषण कमी करणे असा व्यापक उद्देश ठेवून प्रत्येक जिल्ह्याला केंद्र व राज्य शासनाकडून ६०:४० प्रमाणात निधी देण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात व शेतकऱ्यांचे ऑनलाईन फॉर्म भरून घेण्यात कृषि विभागाने अनास्था दाखविल्यामुळे सुमारे ५.५ कोटीचे अनुदान परत जाण्याच्या मार्गावर आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा निधी परत जाऊ नये महणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१६) :**(१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उद्‌गीर, देवणी व जळकोट तालुक्यात परजिल्हयातील देशी दारुची दुकाने स्थालांतरीत झाल्याबाबत

**(११) ४४७३३ (२८-०४-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उद्‌गीर, देवणी व जळकोट तालुक्यात परजिल्हयातील देशी दारुची दुकाने मागील चार वर्षात स्थालांतरीत झाली आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर देशी दारू दुकाने स्थालांतरीत करु नये व ही दुकाने उदगीर येथे चालू करण्याची परवानगी प्रशासनाने देवू नये यासाठी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी व जनतेने तसेच सामाजिक संघटनांनी शासनाकडे मागणी केली होती हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर देशी दारू दुकानास कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारली होती हे खरे आहे काय,

(४) असल्यास, नागरीक व प्रशासनाच्या विरोधानंतरही नगरपालिका शेजारी व महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याजवळ देशी दारुचे दुकान चालु झाले हे खरे आहे काय,

(५) असल्यास, नगरपालिका प्रशासनाने सदर दुकानाचे ना हरकत दिनांक ४ डिसेंबर, २०१५ रोजी रद्द केले होते, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, रद्द झालेले दुकान उदगीर शहरात चालू होवू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०७-२०१६) :**(१), (२) व (३) होय.

(४) सदर अनुज्ञप्तीच्या परिसरात इतरही अनुज्ञप्त्या कार्यरत असल्याने उदगीर नगरपालिका कॉम्प्लेक्स येथील जागेत सदर सीएल-३ अनुज्ञप्तीस परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि स्थानिक नागरिकांचा विरोध लक्षात घेता अनुज्ञप्तीधारकाने स्वत:हून अनुज्ञप्ती बंद ठेवली आहे.

(५) नगरपालिका प्रशासन उदगीर यांचेकडून सदर अनुज्ञप्तीस दिलेले नाहरकत प्रमाणपत्र रद्द केले असल्याबाबतचा कोणताही अहवाल राज्य उत्पादन शुल्क कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्हयातील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय शेतकरी परिसंवाद निधीचा गैरवापर झाल्याबाबत

**(१२) ४४७६० (२८-०४-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय शेतकरी परिसंवादावर महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषदने टाच आणल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षीच्या परिसंवाद निधीचा गैरवापर न झाल्याची खातर जमा होत नाही तोपर्यंत परिसंवाद घेता येणार नाही असे परिषदेने कृषी विद्यापीठाला कळविले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासंदर्भात निधीचा गैरवापर झाल्याच्या तक्रारी शासनाकडे करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती परिसंवाद निधीचा गैरवापर करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१३-०७-२०१६) :**(१) होय.

(२) आंतरराष्ट्रीय शेतकरी परिसंवाद-२ च्या आयोजनास स्थगिती देण्याचे कृषि परिषदेने दि. ७.१.२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३), (४), (५) व (६) डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी डिसेंबर, २०१४ मध्ये आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिसंवादाच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेला देण्यात आल्या आहेत.

---

**भारतीय कृषी अनुसंधान परिषदेकडून आलेल्या निधीतून पाचगणी येथे कर्मचाऱ्यांना वैयक्तीक प्रशिक्षक देवून विद्यापीठाच्या निधीचा झालेला गैरव्यवहार**

**(१३) ४४७६१ (२८-०४-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंजाबराव कृषी विद्यापीठ अकोलातील शास्त्रज्ञ परिवारासह शासकीय खर्चाने कृषी परिषद व कार्यकारी परिषदेच्या परवानगी विना बॅकॉकला जाणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच शासनाकडून कुढलीही मान्यता न घेता भारतीय कृषी अनुसंधान परिषदेकडून आलेल्या निधीतून पाचगणी येथे कर्मचाऱ्यांना वैयक्तीक प्रशिक्षक देवून विद्यापीठाच्या निधीचा गैरव्यवहार केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने पुण्याच्या महाराष्ट्र कृषी अनुसंधान परिषदेला चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०७-२०१६) :**(१) नाही.

(२) व (३) सदर प्रकरणी शासनाच्या दि.१६.१२.२०१५ च्या पत्रान्वये सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश देण्यात आले आहेत.

(४) अद्याप चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथील आरटीओ कार्यालयात रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१४) ४४७६२ (२८-०४-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील आरटीओ कार्यालयात कर्मचारी व अधिकाऱ्यांची ५४ पदे मंजूर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर पदापैकी फक्त ३४ अधिकारी व कर्मचारी कार्यरत असल्याचे व २० पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदामुळे शासनाच्या महसुलावर व नागरीकांच्या सुविधेवर दुष्परिणाम होत आहे हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, मंजुर पदानुसार रिक्त पदे भरण्याकरिता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अकोला या कार्यालयासाठी कर्मचारी व अधिकाऱ्यांची ५९ पदे मंजूर आहेत.

(२) दिनांक ३०.०४.२०१६ रोजी अकोला कार्यालयातील मंजूर, भरलेल्या व रिक्त पदांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे:

| गट | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| अ | ९ | ५ | ४ |
| क | ४५ | ३१ | १४ |
| ड | ५ | ३ | २ |
| एकूण | ५९ | ३९ | २० |

(३) नाही. रिक्त पदांचे कामकाज उपलब्ध अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

(४) रिक्त पदे भरण्यास परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव अपर मुख्य सचिव (सेवा) यांचे अध्यक्षतेखालील सचिव समितीसमोर सादर केला आहे, आणि लिपीकवर्गीयांच्या भरतीसाठी बाह्य संस्था नियुक्त करणेकामी निविदा प्रक्रिया राबविण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मे.सतीष ॲग्रो सर्व्हिस सेंटर चां.बा. यांनी किटकनाशक अधि. १९७१ चे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्या रद्द करण्यात आलेल्या परवान्याच्या निलंबन काळात वाढ करण्यात आल्याबाबत**

**(१५) ४५०११ (२८-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.सतीष ॲग्रो सर्व्हिस सेंटर चां.बा. यांनी किटकनाशक अधि. १९७१ चे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्या रद्द करण्यात आलेल्या परवान्याच्या निलंबन काळात वाढ करण्यात आली याबाबत स्थानिक विसस अचलपूर यांनी संबंधित मा. मंत्री कृषी यांना दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र लिहून मागणी केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती मे.सतीष ॲग्रो सर्व्हिस सेंटर चां.बा. यांनी किटकनाशक अधि. १९७१ चे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्या रद्द करण्यात आलेल्या परवान्याच्या निलंबन काळात वाढ करण्यात आली याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) मे.सतिश ॲग्रो सर्व्हिस सेंटर चां.बा. यानी कीटकनाशक अधिनियम १९७१ चे उल्लघंन केल्यामुळे त्यांचा कीटकनाशक विक्री परवाना कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी दि.३०.१०.२०१५ ते दि.३१.१२.२०१५ पर्यन्तच्या कालावधीसाठी निलंबित केलेला होता. तथापि, विभागीय कृषी सहसंचालक अमरावती यांचेकडे दिनांक २३.११.२०१५ झालेल्या सुनावणीमध्ये मे.सतिश ॲग्रो सर्व्हिस सेंटर चां.बा. यांनी तपासणीमध्ये आढळुन आलेल्या त्रुटींची पुर्तता केल्यामुळे त्यांचा परवाना दि.०२.१२.२०१५ पासून पूर्ववत करण्यात आलेला असून निलंबन काळात वाढ करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अपंगाना तातडीने नवीन बस स्थानकात जागा मिळण्याबाबत**

**(१६) ४५०१९ (२८-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९५ च्या अपंगपुर्नवसन कायद्यानुसार सिनार येथील श्री. प्रकाश सरोदे व श्री. अरुण पाचोरे या जन्मत अपंग असलेल्या व्यवसायिकांना जुन्या सिनर एसटी स्थानकाच्या पुर्नवसनानंतर नवीन बस स्थानकात व्यावसायिक जागा उपलब्ध करुन न दिल्यामुळे या अपंगावर उपासमारीची वेळ येऊ नये याकरिता विविध न्यायालयीन निवाड्याच्या आधारे या अपंगाना तातडीने नवीन स्थानकात जागा मिळावी याकरिता विसस अचलपूर यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी मा. मंत्री परिवहन यांना लेखी पत्र देऊन मागणी केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अपंगाना तातडीने नवीन बस स्थानकात जागा मिळण्याबाबत तसेच सन १९९६ च्या अपंग पुर्नवसन कायद्याची संपूर्ण हमी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) होय.
(२) बी.ओ.टी. तत्वावरील बसस्थानकाचे व्यापारी गाळे वितरीत करण्याचे हक्क संबंधित विकासकास आहेत, त्यामुळे जुन्या परवानाधारकाला सदर व्यावसायिक गाळे वितरीत करणे, ही बाब राज्य परिवहन महामंडळाच्या अखत्यारित नाही. तसेच जनरल प्रोव्हीजन, पान स्टॉल, दूरध्वनी, उपहारगृह, फळदुकान या आस्थापनाधारकांनी निवासी उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, मुंबई शासकिय निवासस्थाने (इव्हीक्शन) नाशिक येथे दि. २८.४.२०१४ रोजी अपिल दाखल केले होते. सदर अपिलाचा निकाल रा.प. महामंडळाच्या बाजूने दि. २४.७.२०१५ रोजी लागलेला आहे. सदर निर्णयाविरुध्द आस्थापनाधारकांनी नाशिक जिल्हा सत्र न्यायालय येथे अपिल दाखल केले असून सदर निर्णय न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### विदर्भातील संत्रा व केळी उत्पादक शेतकऱ्यांना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या धर्तीवर मदत देय करुन प्रोत्साहन देण्याबाबत

**(१७) ४५०२५ (२८-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील संत्रा व केळी उत्पादक शेतकऱ्यांना उस उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या धर्तीवर मदत देय करण्याबाबत तसेच पिकांच्या हमीभावांमध्ये समाविष्ट करण्याबाबत, तसेच अंगणवाडी, आश्रम शाळा, अनाथलयांमध्ये या फळाचा अन्नपुरवठ्यामध्ये समावेश करण्याबाबत त्याचप्रमाणे या फळ उत्पादकांना १०० % वाहुक खर्च आणि लेखी मागणी वि.स.स. अचलपूर जि.अमरावती यांनी दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ रोजी राज्याच्या फलोत्पादन मंत्री महोदयांकडे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती विदर्भातील संत्रा व केळी उत्पादक शेतकऱ्यांना उस उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या धर्तीवर मदत देय करण्याबाबत तसेच पिकांच्या हमीभावांमध्ये समाविष्ट करण्याबाबत, तसेच अंगणवाडी, आश्रम शाळा, अनाथलयांमध्ये या फळाचा अन्नपुरवठ्यामध्ये समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६) :**(१) व (२) होय, याबाबतचे निवेदन दि.१६/१२/२०१५ रोजी मा.मंत्री (फलोत्पादन) यांच्याकडे प्राप्त झाले आहे.

(३) विदर्भातील संत्रा व केळी उत्पादक शेतकऱ्यांना ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या धर्तीवर अनुदान मंजूर करण्याची बाब तपासून पहाण्यात येत आहे.

संत्रा व केळी यांच्या किमान आधारभूत किंमती जाहीर करणे ही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बाब आहे.

जिल्हा परिक्षेत्रामध्ये महिला व बालकल्याण समिती मार्फत अंगणवाडी, आश्रमशाळा, अनाथालयांतील विविध कार्यक्रमांतर्गत मुलांना दुध, सोयादुध, चिक्की, लाडु, अंडी, फळे, गुळ, शेंगदाणे यांच्याबरोबरच ऋतुमानानूसार संत्री, केळी व इतर फळे उपलब्ध करुन देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कृषि समृध्दी महोत्सव २०१६ च्या आयोजनाकरीता राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रम प्रोत्साहन देण्याकरीता अचलपूर तालुक्यात निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१८) ४५०२६ (२८-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर तालुक्यातील कृषि समृध्दी महोत्सव २०१६ करिता स्थानिक विसस अचलपूर यांनी कृषि विस्तार कार्यक्रम प्रोत्साहनांतर्गत रु. २५ लक्ष रुपयांच्या अनुदानाची दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी राज्याचे मंत्री कृषि यांचेकडे लेखी पत्र लिहून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती कृषि विस्तार कार्यक्रमांना विशेष अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे. आत्मा येजनेअंतर्गत कृषि महोत्सवासाठी निधीची तरतूद नसल्यामुळे ता.अचलपूर, जि.अमरावती येथे दि. २२ जानेवारी ते २५ जानेवारी, २०१६ या कालावधीत आयोजित कृषि समृदधी महोत्सवास मागणी नुसार निधी मंजूर करण्यात आला नाही. या बाबतची वस्तुस्थिती सन्माननीय आमदार महोदयांना या विभागाच्या दि.१६ एप्रिल, २०१६ च्या पत्रान्वये निदर्शनास आणुन देण्यात आली होती.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील युरियाचा काळाबाजार थांबविण्याबाबत**

**(१९) ४५५७५ (२८-०४-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील युरियाचा काळाबाजार थांबविण्याच्या दृष्टीकोनातून ७/१२ असणाऱ्याच शेतकऱ्यांना युरिया देणार असल्याचे केंद्र शासनाने प्रास्ताविक धोरण ठरविले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांना सहज युरिया उपलब्ध व्हावा याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) केंद्र शासनाने मे, २०१५ पासून आयातीत युरिया व डिसेंबर, २०१५ पासनू देशातील उत्पादित युरिया नीमकोटींग करुनच पुरवठा करण्याबाबत सर्व युरिया उतपादक/पुरवठादारांना बंधनकारक केलेले आहे. अद्यापही युरिया केंद्र शासनाकडून नियंत्रित दराने कमी किंमतीमध्येच शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील कृषी विभागाने अनाठाई खरेदी केलेल्या फवारणी पंपाबाबत**

**(२०) ४५७३२ (२८-०४-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील जिल्हा कृषी विभागाने शेतक-यांच्या पिकांवर औषधी फवारण्यासाठी हातपंप खरेदी केल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती फवारणी पंपाची खरेदी केली व जिल्हयातील तालुका निहाय किती पंप वाटप केले व किती पंप शिल्लक आहे यामध्ये कृषी आयुक्तालयाचे नियमांचे पालन करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, पंप खरेदी करण्याचे निकष काय होते याचा खुलासा करण्याबाबत तसेच अनियमितता आढळून आल्यास संबंधित अधिका-यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (११-०७-२०१६)** :(१) सन २०१५-१६ पासून डी.बी.टी. तत्वावर कृषी अवजारे पुरवठा करण्यात येत असल्याने कुठल्याही योजनेमध्ये पिकावर औषधे फवारण्यासाठी पंप खरेदी केलेली नाही. तथापि, सन २०१४-१५ मध्ये एकूण १३९४७ फवारणी पंप ५०% अनुदानावर वाटप करण्यात आले असून, काही लाभार्थ्यांकडुन लोकवाटा प्राप्त न झाल्याने २६२ फवारणी पंप शिल्लक आहेत.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे विभाजन करून सिंदेवाही येथे नवीन विद्यापीठ स्थापन करण्याबाबत**

**(२१) ४५९५३ (२८-०४-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे विभाजन करून नवीन विद्यापीठ स्थापन करण्यासाठी शासनाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे डॉ. बी.व्यंकटेश्वरलू यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यीय स्थापन केलेल्या मूल्यांकन समितीने त्यांच्या अहवाल दिनांक २७ जानेवारी २०१६ रोजी शासनाकडे सादर केला असल्याची माहिती दिनांक ३० जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने नागपूर, सिंदेवाही, मूल, चंद्रपूर येथील जागेची व भौगोलिक परिस्थितीची पाहणी करून अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमूख कृषी विद्यापीठाचे विभाजन करावे असे मत सादर केलेल्या अहवालात म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केळकर समितीसह सदर मुल्यांकन समितीने आपल्या अहवालात सिंदेवाही येथे नवीन कृषी विद्यापीठ स्थापन करावे असे मत सादर केलेल्या अहवालात म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मुल्यांकन समितीने सादर केलेला अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१६) :**(१) ते (५) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला या दोन कृषि विद्यापीठांचा विस्तार विचारात घेऊन त्यांचे विभाजन करुन स्वतंत्र कृषि विद्यापीठ स्थापन करणे आवश्यक आहे का, याची तपासणी करुन यासंदर्भात शासनास मार्गदर्शन करण्यासाठी दिनांक १९.०८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये डॉ.वाय.एस.पी.थोरात, माजी अध्यक्ष नाबार्ड यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली होती.

सदर समितीने आपला अहवाल दि.६/१/२०१५ च्या पत्रान्वये शासनास सादर केला होता. सदरच्या अहवालावर कार्यवाही करण्यासाठी काही आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय बाबींची माहिती घेणे आवश्यक होते. त्यामुळे या दोन विद्यापीठांचे विभाजन करण्याकरीता लागणारा आवश्यक तपशील प्राप्त करण्याकरीता दिांक १४.०५.२०१५ च्या शासननिर्णयान्वये डॉ.वेंकटेश्वरल्लू, कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने दिनांक २९.१२.२०१५ च्या पत्रान्वये आपला अहवाल शासनास सादर केला आहे.

सदरच्या अहवालावर यथोचित कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

---

## निफाड तालुका कृषी अधिकारी यांना दोषी ठरविल्याबाबत

**(२२) ४६००१ (२८-०४-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड तालुका कृषी अधिकारी यांने कर्तव्य पार पाडतांना केलेल्या कसुराबाबत अधिक्षक कृषी अधिकारी (दक्षता पथक) कृषी आयुक्तालय पुणे यांनी दि. ४/०८/२०१४ रोजी त्यांना दोषी ठरवलेले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. कृषी अधिकारी (दक्षता पथक) यांनी दिलेल्या अहवाला प्रमाणे कारवाई करण्याचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा.कक्ष अधिकारी ५ ए यांनी दिलेले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.अधिक्षक कृषी अधिकारी (दक्षता पथक) यांनी केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०७-२०१६) :**(१) अधीक्षक कृषी अधिकारी (दक्षता पथक) यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीच्या आधारे विभागीय चौकशी करण्यात येत आहे. विभागीय चौकशी अंती दोषसिध्दता निश्चित होईल.

(२) होय.

(३) व (४) संबंधितांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

---

## शिरोळ (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) केळीचे दर उतरल्यामुळे केळी उत्पादकांनी नुकसान भरपाई देण्याची केलेली मागणी

**(२३) ४६२८३ (२८-०४-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) केळीचे दर उतरल्यामुळे केळी उत्पादकांनी नुकसान भरपाई देण्याची मागणी शासनाकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच आयात निर्यातीचे चुकीचे धोरणे आणि दलालांकडून होणारी पिळवणूक केळी उत्पादकांना सहन करावा लागत आहे हे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील केळी उत्पादकांना नुकसान भरपाई देण्याबाबत आयात -निर्यातीचे धोरण आणि दलालांकडून होणारी पिळवणूक थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६)** :(१) याबाबतचे निवेदन या विभागामध्ये प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२), (३) व (४) शेतकऱ्यांची दलालांकडून पिळवणूक होऊ नये यासाठी शेतकऱ्यांच्या उत्पादक संस्था स्थापन करुन त्यांना कृषि निविष्ठा, तंत्रज्ञान विस्तार व उत्पादीत मालाची एकत्रित व थेट विक्री, विविध कंपन्यांना व मार्केटमध्ये करण्यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शक व प्रोत्साहन देण्यात येते. राज्यात माहे फेब्रुवारी, २०१६ अखरे एकूण ७२७ शेतकरी उत्पादक संस्था/कंपन्यांची नोंदणी झालेली आहे. शेतकऱ्यांकडून या योजनेस चांगला प्रतिसाद मिळत असून अशा शेतकऱ्यांच्या कंपन्यांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.

जयसिंगपूर कृषि उत्पन्न बाजार समिती ता.शिरोळ, जिल्हा कोल्हापूर येथे केळीची कोणत्याही प्रकारे आवक होत नसून दलालांकडून पिळवणूक झाल्याबाबतची लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.

तसेच केळी उत्पादकांना दर्जेदार केळी उत्पादनाची माहिती व्हावी यासाठी त्यांना निर्यातक्षम केळी उत्पादन व निर्यातवृध्दी याबाबत प्रशिक्षण देण्यात येते.

---

**पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील एस.टी बसचे आगर समस्याग्रस्त**

**(२४) ४६५५१ (२८-०४-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील एस.टी बसचे आगर समस्याग्रस्त असल्याचे माहे नोव्हेबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ,पांढरकवडा आगारास उपलब्ध असलेल्या बसेसची दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती पांढरकवडा आगारास उपलब्ध असलेल्या बसेसची दुरवस्था दूर करुन नवीन बसेस देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६)** :(१) व (२) नाही.

(३) व (४) पांढरकवडा आगारातील गत ३ वर्षात १० वाहने मोडीत काढण्यात आली असून १८ नवीन वाहने देण्यात आली आहेत.

आगारातील वाहनांची स्थिती चांगली राहण्यासाठी नियोजित कार्यक्रमानुसार वाहनांची दैनिक, दशदिनी व त्रैमासिक देखभाल केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती विभागातील कृषि अधिकारी, व कर्मचाऱ्यांचे ८८२ पदे रिक्त असल्याबाबत**

**(२५) ४६६१६ (२८-०४-२०१६). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील कृषि अधिकारी, व कर्मचाऱ्यांचे ८८२ पदे रिक्त असल्याने अनेक प्रशाकिय कामे कमी कर्मचारी असल्यामुळे प्रलंबित आहेत, शासनाच्या योजना सर्व शेतकऱ्यांपर्यत पोहचत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती विभागातील कृषि अधिकारी, व कर्मचाऱ्यांचे ८८२ रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यतात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती व अधिनस्त कार्यालयातील मार्च २०१६ अखेर मंजूर ४१०३ पदांपैकी ३१२१ पदे भरण्यात आली असून ९८२ पदे रिक्त आहेत. कार्यरत कर्मचाऱ्यांकडून कृषि विषयक योजनांची अंमलबजावणी केली जात आहे.

(२) गट-अ संवर्गातील पदे भरलेली आहेत. गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. गट-क संवर्गातील कृषी सेवकांची पदे भरण्याकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. गट-ड संवर्गातील पदांबाबत जिल्हा स्तरावर पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अल्पसंख्यांकबहुल शाळांना पायाभूत सोयी-सुविधांकरिता**
**भरीव आर्थिक अनुदान प्रत्यार्पित करण्याबाबत**

**(२६) ४६७४१ (२८-०४-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांकबहुल शाळांना पायाभूत सोयी-सुविधांकरिता भरीव आर्थिक अनुदान प्रत्यार्पित करण्याबाबतची मागणी राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील जनप्रतिनिधी, शैक्षणिक क्षेत्रातील धुरिणांनी तसेच विविध प्रादेशिक विभागातील उच्च/व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांनी मा.मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास) तसेच संबंधित जिल्ह्यांच्या / प्रादेशिक विभागांच्या मुख्याधिकार्यांकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीअंती राज्यातील अल्पसंख्यांक बहुल शाळांना पायाभूत सोयी-सुविधांकरिता भरीव आर्थिक अनुदान प्रत्यार्पित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६) :**(१) नाही. तथापि प्रश्नात नमूद "प्रत्यार्पित" ऐवजी "वितरित" असे अभिप्रत असल्याचे दिसून येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) राज्यातील अल्पसंख्याक बहूल शाळांना पायाभूत सोयी-सुविधांकरिता दि.२३/०३/२०१६ च्या शासन निर्णयान्वये सन २०१५-१६ मध्ये रु.१९२३.६३ लक्ष अनुदान या योजनेंतर्गत मंजूर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कोरडवाहू शाश्वत शेती कार्यक्रम मृदस्थानी जलसंधारण व मशागतीची कामे अंतर्गत यांत्रिकीकरण कार्यक्रम राबविणेबाबत

**(२७) ४६७६४ (२८-०४-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कोरडवाहू शाश्वत शेती कार्यक्रम मृदस्थानी जलसंधारण व मशागतीची कामे अंतर्गत यांत्रिकीकरण कार्यक्रम औजारे या योजनेमधून गतवर्षी मृदस्थानी व जलसंधारण आणि मशागतीची कामे वळेत करणेसाठी यांत्रिकीकरणाचा कार्यक्रम राबविणेबाबत राज्यस्तरावरुन सूचना दिल्या असून त्यानुसार तालुका कृषी अधिकारी, करवीर यांचेमार्फत मागणी असलेल्या ११८ लाभार्थीचे औजारे प्रस्ताव तयार करणेत आले हाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील सादळे, मादळे, जठारवाडी ही गांवे कोरडवाहू शाश्वत शेती विकास कार्यक्रम सन २०११-१२ अंतर्गत निवड करणेत आली आहेत, सदरचा कार्यक्रम सलग पुढे ३ वर्षे कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाकरीता महाराष्ट्र कृषी विकास महामंडळ यांचेकडे अनुदानाचा तरतूद आयुक्तालयाने परत घेतल्यामुळे सदर शेतक-यांना अनुदानाचा लाभ देता आला नाही सदर लाभार्थ्यांचा लोकवाटा रक्कम ३४ लाख ३३ हजार ३५७ रुपये औद्योगिक विकास महामंडळ, कोल्हापूर यांचेकडे डी.डी.व्दारे जमा आहेत. परंतु शासनस्तरावरुन संबंधित योजनेचे अनुदान काढून घेतल्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना औजारे पुरवठा झालेली नाही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरडवाहू शाश्वत शेती कार्यक्रम मृदस्थानी जलसंधारण व मशागतीची कामे अंतर्गत यांत्रिकीकरण कार्यक्रम औजारे निधी तरतूदीबाबत दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.कृषी मंत्री यांना निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(५) असल्यास, संबंधित औजारे मिळवण्यासाठी सध्या सुरु असलेली कृषी यांत्रिकीकरण उपअभियान या योजनेमधून तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कोरडवाहू शाश्वत शेती विकास कार्यक्रम ही केंद्र व राज्य शासनाची योजना आहे. कोरडवाहू शेती अभियान ही योजना १०० % राज्याची असून तिचा आराखडा ३ वर्षाकरीता आहे. सन २०१२-१३ या वर्षात सदर योजना सादळे, मादळे व जठारवाडी या गावात राबविण्यात आली.

या कार्यक्रमांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यासाठी रु.१.६५ कोटीचा लक्षांक होता, तथापि माहे ऑक्टोबर २०१४ अखेर महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ (MAIDC) कोल्हापूर यांच्याकडून रु.४४.८१ लक्ष मागणी नोंदविण्यात आल्यामुळे सदर लक्षांक रु.४४.८१ लक्ष ठेवण्यात आला. दरम्यान नोव्हेंबर, २०१४ मध्ये औजारांसाठी लोकवाटयाची अतिरिक्त मागणी रु.३४.४९ लक्ष MAIDC कडे प्राप्त झाल्यामुळे त्यास समरुप राज्य वाटा जानेवारी, २०१६ मध्ये रु.२७.९० लक्ष उपलब्ध करुन देण्यात आला. त्यामुळे सद्यस्थितीत सर्व लाभार्थ्यांना औजारे वाटप झाले आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) उपरोक्त (३) प्रमाणे संबंधित लाभार्थ्यांना औजारे पुरवठा पूर्ण झालेला असून कोणतीही मागणी प्रलंबित नाही.

(६) लागू नाही.

---

**शेतकरी अपघात विमा योजनेबाबत**

**(२८) ४६७७३ (२८-०४-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये नैसर्गिक आपत्ती किंवा अपघातामध्ये शेतकरी कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच मृत्यु झाल्यास शासनाकडून संबंधित कुटुंबाला शेतकरी जनता अपघात विमा योजनेअंतर्गत १ लाख रुपयांची मदत दिली जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मदत मिळण्याकरिता अपघातग्रस्त शेतकऱ्यांचे नाव ७/१२ वर आले तर त्या संबंधी फेरफार नोंद, पोलिस पंचनामा, शवविच्छेदन अहवाल इत्यादी कागदपत्रे प्रस्तावास जोडावी लागतात हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वडीलधारी माणसे हयात असल्याने कुटुंबातील अन्य कर्त्या व्यक्तींची नांवे (मुलांची) ७/१२ पत्रकी नोंद नसतात परंतु कुटुंबाचा भार या मुलांवर अवलंबून असतो त्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्यास संबंधित कुटुंबाला या योजनेचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकरी अपघात विमा योजनेचा लाभ खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना द्यायचा असेल तर ७/१२ पत्रकी नाव नोंदीची जाचक अट शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :**(१) सन २००५-०६ पासून राज्यात शेतकरी अपघात विमा योजना राबविण्यात येत आहे. दि. १ डिसेंबर, २०१५ पासून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना रु.२ लाखाच्या विमा संरक्षणासह राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील सर्व ७/१२ धारक खातेदार शेतकऱ्यांचा रु.२ लाखांचा विमा शासनामार्फत उतरविण्यात आलेला असून अपघाती मृत्यू झाल्यास रु. २ लाख व एका अवयवास अपंगत्व आल्यास रु. २ लाख इतकी विमा रक्कम विमा कंपनीकडून देण्यात येते.

(२) होय.

(३) प्रस्तुत योजनेच्या अटी व शर्तीनुसार व्यक्तीचे नाव ७/१२ उताऱ्यावर असणे आवश्यक आहे. ज्या व्यक्तीचे नाव ७/१२ उताऱ्यावर आहे. त्या व्यक्तीलाच खातेदार शेतकरी समजले जाते व अशी व्यक्तीच विम्याचा लाभ मिळण्यासाठी पात्र ठरते.

(४) सदर अट शिथिल करता येऊ शकत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील इस्लामिक मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी अर्थसहाय्य मिळण्याबाबत**

**(२९) ४७२५५ (२८-०४-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ जाकिर हुसेन मदरसे आधुनिकिकरण योजनेअंतर्गत राज्यातील ईस्लामिक मदरशांच्या नुतनीकरणासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुतनीकरणासाठी साधारणतः किती अर्ज आले आहेत,

(३) असल्यास, मदरशांच्या नुतनीकरणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, मदरशांच्या नुतनीकरणासाठी प्रति मदरसा किती रुपयांचे अनुदान देण्यात आले,

(५) असल्यास, मदरशांच्या नुतनीकरणासाठी आर्थिक तरतुद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) राज्यातील नोंदणीकृत मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी दि.११/१०/२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत असलेल्या योजनेचे थोडक्यात स्वरुप पुढील प्रमाणे आहे.

अ) मदरसांना पायाभुत सोयी सुविधासाठी अनुदान:-राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत मदरशांना पेयजलाची व्यवस्था करणे, प्रसाधन गृह उभारणे, विद्यार्थ्यांसाठी फर्निचर, इमारतीचे नुतनीकीकरण व डागडुजी, संगणक व प्रयोगशाळा साहित्य या बाबीसाठी वार्षिक कमाल रु.२.०० लाखाच्या मर्यादेत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच ग्रंथालय व बुक बँक सुविधेसाठी एका मदरशाला एकदाच रु.५०,०००/- इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

ब) मदरसांमध्ये नेमण्यात येणाऱ्या शिक्षकांचे मानधन:-
राज्यातील नोंदणीकृत मदरशांमध्ये विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी व उर्दु या विषयाचे शिक्षण देण्यासाठी डी.एड अथवा बी.एड शिक्षकांचे (जास्तीत जास्त ३) मानधन देण्यासाठी शासनातर्फे अनुदान (बी.एड शिक्षक रु.८०००/- प्रति महा व डी.एड शिक्षक रु ६०००/- प्रति माह) शासनातर्फे देण्यात येते.
क) मदरसामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती:-
मदरसामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी शासनमान्य शाळेमध्ये माध्यमिक शिक्षणासाठी किंवा आय.टी.आय.ला प्रवेश घेतील अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती (इयत्ता ९वी व १० साठी रु.४०००/- वार्षिक तसेच इयत्ता ११ वी, १२ वी व आय.टी.आय साठी रु.५०००/- वार्षिक) देण्यात येते.
(५) सन २०१६-१७ मध्ये सदर योजनेसाठी रु.१० कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देशातील पहिले कृषी हवामान संशोधन केंद्र बदनापूर कृषि संशोधन केंद्राच्या २० हेक्टर क्षेत्रावर उभारण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(३०) ४७३४३ (२८-०४-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदनापूर कृषि संशोधन केंद्राच्या २० हेक्टर क्षेत्रावर देशातील पहिले कृषी हवामान संशोधन केंद्र उभारण्याचा ६७ कोटी रुपयांचा प्रस्ताव राज्य शासनाला सादर केलेला प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावावर अद्यापपर्यंत निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत तातडीने निर्णय घेण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१६) :**(१) नाही. वंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांनी कृषि हवामान संशोधन केंद्र, बदनापूर, जिल्हा जालना येथे स्वतंत्र हवामान संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबत रु.४२.१७ कोटीचा प्रस्ताव महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्याकडे फेब्रुवारी, २०१५ मध्ये सादर केला होता.
(२) व (३) सदर प्रस्तावावर महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या दि.१८/३/२०१५ च्या बैठकीत झालेल्या चर्चेत स्वतंत्र हवामान संशोधन केंद्र स्थापन करण्याऐवजी सध्या अस्तित्वात असलेल्या हवामान संशोधन केंद्रांचे अत्याधुनिकीकरण करावयाचे असल्यास विद्यापीठांनी यंत्रसामग्री व इतर आवश्यक साहित्य खरेदीसाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

तसेच राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राज्यात महसूल मंडळ स्तरावर २०६५ ठिकाणी स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणी प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा डोंगरगाव, (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील कृषी खात्याच्या जागेवर शासकीय कृषी महाविद्यालय सुरु करण्याच्या मागणीबाबत**

**(३१) ४७५८९ (२८-०४-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा डोंगरगाव, (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील कृषी खात्याच्या जागेवर शासकीय कृषी महाविद्यालय सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (तुमसर) यांनी दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावर मुख्यमंत्र्यांनी दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी अप्पर मुख्य सचिव, कृषी यांना निर्देश दिले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने यावर पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) व (४) या प्रकरणी डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचेकडून प्राप्त अहवालानुसार या ठिकाणी कृषि महाविद्यालयासाठीच्या निकषानुसार आवश्यक असलेली जमीन उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे.

---

**राज्यातील अल्पसंख्याक विकासाच्या सर्वागिण विकासासाठी स्वतंत्र संचालनालय स्थापन करण्याबाबत**

**(३२) ४७८३६ (२८-०४-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अल्पसंख्यांक विकासाच्या सर्वागिण विकासासाठी स्वतंत्र संचालनालय स्थापन करण्यात यावे अशी मागणी अल्पसंख्याक आयोगाने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्‍भवत नाही.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**भिवंडी एसटी आगारात नवीन बसेस उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३३) ४८०४७ (२८-०४-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथून असंख्य प्रवासी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहनाच्या बसेसने जत, विजापूर येथे वारंवार प्रवास करीत असल्याने भिवंडी आगारात नवीन बसेसची व्यवस्था करण्याबाबतची मागणी तेथील स्थानिक नागरीक, प्रवासी व लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे दिनांक १९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच भिवंडी आगारात जुन्या व नादुरुस्त एसटी बसेस पाठविल्याने अनेकवेळा बसेस अर्ध्या रस्त्यातच बंद पडणे अशा अडचणी निर्माण होत असल्याने तेथील प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती भिवंडी एसटी आगारात नवीन बसेस उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) होय.
(२) नाही.
(३) व (४) भिवंडी आगारास गत तीन वर्षात एकूण १७ नवीन बसेस व माहे एप्रिल, २०१६ मध्ये १ नवीन बस देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**दिघंची, निंबवडे, करगणी (ता.आटपाडी, जि.सांगली) परिसरातील डाळींबाच्या पिकांचे झालेले नुकसान**

**(३४) ४८५२८ (२८-०४-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिघंची, निंबवडे, करगणी (ता.आटपाडी, जि.सांगली) परिसरातील डाळींबाच्या पिकावर माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१५ च्या सुमारास तेल्या इत्यादीसह अनेक रोग पडल्यामुळे शेतक-यांचे लाखो रुपयाचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतक-यांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवकाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील चांदवड तालुक्यात शासनाच्या कोरडवाहू विकास अभियानांतर्गत कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी अनुदान तत्वावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३५) ४९०८८ (२८-०४-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील चांदवड तालुक्यात शासनाच्या कोरडवाहू विकास अभियानांतर्गत कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी अनुदान तत्वावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेची सुमारे २ कोटी ३७ लाख रुपयांची कामे प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चांदवड तालुक्यातील मंगरुळ गावासाठी राज्य शासनाने तीन वर्षासाठी ३ कोटी ५० लाख रुपये खर्चाची कोरडवाहू विकास अभियान योजना मंजूर केली होती मात्र २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षासाठी ३.५० कोटी अनुदानापैकी केवळ १ कोटी १३ लाख रुपयांची काम करण्यात आली व अद्याप २ कोटी ३७ लाख रुपयांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापही २ कोटी ३७ लाख रुपयांची कामे पूर्ण करण्यास निधी न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, तातडीने हा निधी वितरीत करुन कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) चांदवड तालुक्यातील मंगरुळ गावासाठी सन २०१३-१४ ते २०१५-१६ या तीन वर्षाकरीता रु.२९६.३२ लाख रकमेचा मंजूर आराखडा होता. त्यापैकी उपरोक्त तीन वर्षामध्ये एकूण रु.१३३.८५ लाख रकमेची कामे पूर्ण करण्यात आली. मंजूर आराखड्यानुसार एकूण रु.१६२.४७ लाख रकमेची कामे प्रलंबित आहेत.

(३) मंजुर आराखड्यानुसार रु.१६२.४७ लाख रकमेची कामे प्रलंबित असून निधी उपलब्धतेनुसार कामे पूर्ण करण्याचा विचार करता येईल.

(४) चालू वर्षाचा निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील माती परीक्षण लक्षांक उद्दिष्टांबाबत**

**(३६) ४९२७७ (२८-०४-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालयांतर्गत चालणा-या जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी कार्यालयाला शेतकऱ्यांच्या शेतातील माती परीक्षणाचे चालू वर्षासाठी ७ हजाराचे लक्षांक असताना केवळ ८८ शेतकऱ्यांचे मातीचे परीक्षण केले आहे हे खरे आहे काय ,

(२) तसेच, या कार्यालयात माती परीक्षणासाठी आवश्यक अधिकारी, कर्मचारी वर्ग फिल्टर पेपर, शुध्द पाणी तसेच सूक्ष्म मूलद्रव्य तपासणीचे अद्यावत यंत्र सामग्री उपलब्ध नाही हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती लक्षांक पूर्ण करण्यासाठी व प्रशिक्षित अधिकारी, कर्मचारी वर्ग, फिल्टर पेपर, शुद्ध पाणी व अद्यावत यंत्र सामग्री उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

सन २०१५-१६ मध्ये परभणी येथील जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी प्रयोगशाळेला मृद आाेग्य पत्रिका योजनेंतर्गत १७९६३ इतके मृद नमूने काढण्याचे लक्षांक देण्यात आलेले होते. मार्च २०१६ अखेर सर्वच १७९६३ नमून्यांची तपासणी करण्यात आलेली असून ८५०१२ मृद आरोग्य पत्रिकांचे शेतकऱ्यांना वितरण करण्यात आलेले आहे.

तसेच चालू सन २०१६-१७ करिता परभणी जिल्हयासाठी ३५९२६ इतके मृद नमूने काढण्याचा लक्षांक देण्यात आलेला असून दि. १३.०५.२०१६ पर्यंनत ३००० मृद नमूने काढण्यात आलेले आहेत. त्यांची तपासणी चालू आहे.

(२) परभणी जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी प्रयोगशाळेतील १३ मंजूर पदांपैकी ११ पदे भरलेली असून २ पदे रिक्त आहेत. तसेच अदययावत यंत्रसामुग्री उपलब्ध असून आवश्यक साधानसामुग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई येथील बेशिस्त वाहन चालकांविरोधात मोहिम हाती घेण्याबाबत**

**(३७) ४९३०६ (२८-०४-२०१६). श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथे मागील ३ वर्षात तब्बल १० लाख ६१ हजार ३१३ चालकांवर वाहतुकीचे नियम तोडल्याप्रकरणी वाहतूक पोलीसांनी कारवाई केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई येथील बेशिस्त वाहन चालकांविरोधात मोहिम हाती घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) वाहतूक नियमांचे पालन व्हावे व वाहनचालकांमध्ये वाहतूकीबाबत शिस्त निर्माण व्हावी याकरीता नवी मुंबई वाहतूक पोलीसांतर्फे वाहतूक नियमांचे उल्लघंन करणाऱ्या कसूरदार वाहन चालकांविरुध्द नियतिपणे विशेष मोहिमा राबविण्यात येतात. यामध्ये मद्य प्राशन करुन वाहन चालविणे, हेल्मेट परिधान न करणे, सीटबेल्ट न लावणे, अवैध प्रवासी वाहतूक, लेन कटींग, काळ्या काचा, वाहन चालविताना मोबाईलवर संभाषण करणे इत्यादींचा समावेश आहे. त्याचप्रमाणे अपघातांना प्रतिबंध व्हावा याकरिता रस्ता सुरक्षा अभियानाद्वारे वाहनचालक व लोकांमध्ये जनजागृती करणे, शाळा-महाविद्यालयामध्ये सेमिनार राबवणे, डिफेन्सीव्ह ड्रायव्हींग वर्कशॉप, पथनाट्य, इत्यादीचे आयोजन केले जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे झोडगे (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथील गावातील देशी दारुचे दुकान बदं करणेबाबत**

**(३८) ४९४८० (२८-०४-२०१६). अॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे झोडगे (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथील गावात ग्रामस्थानी दारुबंदी करण्याचा ठराव ग्रामपंचायतने मंजूर करुन अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, नाशिक, प्रधान सचिव, राज्य उत्पादन शुल्क व दारुबंदी विभाग, मंत्रालय, प्रांताधिकारी मालेगांव, तहसिलदार, मालेगाव, महिला आयोग नाशिक व मालेगाव, उपनिरीक्षक पोलीस कार्यालय मालेगांव यांना दारुबंदी करण्याबाबतचे निवेदन देऊनही देशी दारुचे दुकान सुरु असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१६ च्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती ग्रामपंचायतीच्या दारुबंदी ठरावानुसार सदर गावातील देशी दारुचे दुकान बदं करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६)** :(१), (२) व (३) मौजे झोडगे ग्रामपंचायतीचा दारुबंदीबाबतचा दि.२.१०.२०१५ रोजीचा ग्रामसभा ठराव तक्रार अर्जासह दि.१४.०१.२०१६ रोजी तसेच दि.२६.०१.२०१६ रोजीचा ग्रामसभा ठराव दि.२२.०२.२०१६ रोजी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक कार्यालयास प्राप्त झाला आहे.

या प्रकरणी चौकशी केली असता सदर ग्रामपंचायतीचे दोन्ही ग्रामसभा ठराव, शासन अधिसूचना, दि.२५.३.२००८ व दि.१२.२.२००९ अन्वये दारुबंदीबाबत विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दती नुसार पारित झालेले नसल्याने सदर सीएल-३ अनुज्ञप्ती बंद करण्याची कार्यवाही करण्यात आली नाही. तथापि तक्रारदार व झोडगे ग्रामपंचायतीचे उपसरपंच यांना दारुबंदीबाबत सदर शासन अधिसूचनान्वये विहित करण्यात आलेली कार्यपध्दती समजावून सांगण्यात आली आहे. त्यानुसार निवेदन/ठराव प्राप्त झाल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दापोली (जि.रत्नागिरी) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ येथील एकूण १८० रिक्त पदे भरण्याबाबत

**(३९) ५००३७ (२८-०४-२०१६). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रत्नागिरी) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ येथील एकूण १८० रिक्त पदे भरण्यासाठी सन २०१४-१५ मध्ये जाहिरात देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्रातील विविध ठिकाणांहून विद्यापिठाकडे अर्ज शुल्कासह प्राप्त झाले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या जाहिरातीमध्ये वर्ग तीनच्या कर्मचा-यांचा समावेश असून त्यामध्ये अधिक्षक, सहाय्यक अधिक्षक, वरिष्ठ लिपिक, लिपिक, प्रयोगशाळा सहाय्यक, परिचर इ.पदांचा समावेश होता, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६)** :(१) होय.
(२) होय.
(३) होय.

(४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.०२.०६.२०१५ व दि.२३.०९.२०१५ मधील तरतूदी आणि शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१५/ प्र.क्र.६४/२०१५ वित्तीय सुधारण-१, दि. १५.०१.२०१६ मधील सुधारणा विचारात घेवून तसेच याबाबत महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचेकडून काही सुचना/आदेश असल्यास ते विचारात घेवून दापोली कृषी विद्यापीठांतर्गत सरळसेवेची रिक्त पदे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरण्यास शासन पत्र क्र.कोकृवि-१११५/प्र.क्र.२८०/६-अे, दि.१८.०२.२०१६ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाबळेश्वरमध्ये वाहतूक कोंडीने एकाचा बळी झाल्याबाबत**

**(४०) ५०४११ (२८-०४-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाबळेश्वरपरसून ६ किमी असलेल्या क्षेत्र महाबळेश्वर या मुख्य रस्त्यावरून इतर प्रेक्षणीय स्थळाकडे जाण्यासाठी हा रस्ता असून या रस्त्यावर नेहमीच वाहतूक कोंडी होत असून याचा त्रास वारंवार नागरिकांना सहन करावा लागत असून दिनांक २४ डिसेंबर, २०१५ रोजी तंटामुक्तीचे अध्यक्ष महादेव शंकर लांगी यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना ग्रामीण रूग्णालयात नेत असता या रस्ता कोडींमूळे रूग्णालयात वेळेवर पोहचू न शकल्याने त्यांचा वाटेतच मृत्यू झाल्याची घटना घडल्याची दिनांक ११ फेब्रुवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्षेत्र महाबळेश्वर या मुख्य रस्त्यावर वाहतूकीची कोंडी होवू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) श्रीक्षेत्र महाबळेश्वर हे पर्यटन स्थळ असल्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात भाविक व पर्यटक येत असतात. येथील रस्ते अरुंद असल्यामुळे येथे वाहतूक कोंडी होत असते.

दि. ११.२.२०१६ रोजी श्री. महादेव शकर लांघी यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात नेत असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे.
(२) श्रीक्षेत्र महाबळेश्वर येथील वाहतूक कोंडी होऊ नये याकरीता पाचगणी/महाबळेश्वर येथे नव्याने पर्यटन वाहतूक पोलीसांची शाखा स्थापन करण्यात आली आहे. वाहतूक नियमानाकरीता १ अधिकारी व २० कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अथवा राज्यातील काही प्रदेशात दारुबंदी लागू करणे सरकारच्या धोरणात्क निर्णयाचा भाग असल्याबाबत**

**(४१) ५०८३९ (२८-०४-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यघटनेतील कलम ४७ नुसार आरोग्याला घातक असणारी द्रव्ये आणि औषधींवर कायम बंदी घालण्याची जबाबदारी राज्य व केंद्र शासनाची आहे. त्यानुसार राज्यात दारुबंदी कायदा लागू करण्यात आल्याने त्यातील कलम १३९ नुसार शासनाला निवडक अथवा संपूर्ण राज्यात दारु, गुटखा, सिगारेट आणि इतर अंमली पदार्थांच्या उत्पादन, सेवन आणि विक्रीवर बंदी घालण्याचा अधिकार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अथवा राज्यातील काही विशिष्ट प्रदेशात दारु बंदी लागू करणे ही बाब राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयाचा भाग आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील जनतेकडून विशेषत: महिला वर्गाकडून याबाबत माहे ऑक्टोबर, २०१५ वा त्या सुमारास सातत्याने शासनाकडे मागणी केली जात असताना ही आजतागायत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१६) :**(१) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाच्या कलम १३९ नुसार मद्य नियमनाबाबत राज्य शासनास संकीर्ण अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. केंद्र शासनाने सन २००४ पासून “सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने कायदा २००३” हा कायदा सर्व राज्यांना लागू केला आहे. तसेच शासन अधिसूचना, दि.१७ जुलै, २०१५ नुसार, राज्यात गुटखा व तत्सम पदार्थांच्या उत्पादन, साठवणूक व विक्रीवर प्रतिबंध घालण्यात आलेले आहे.

(२) होय.

(३) राज्यातील विविध भागामधील जनतेकडून तसेच महिला वर्गाकडून संबंधित गावातील/क्षेत्रातील दारुबंदी मागणी केली जाते. शासनाने दि.२५ मार्च, २००८ आणि दि.१२ फेब्रुवारी, २००९ च्या अधिसूचनेद्वारे एखाद्या गावात अथवा महानगरपालिका/ नगरपालिका वार्डमध्ये दारुबंदी करण्याबाबत कार्यपाध्दती विहित केली आहेत. दारुबंदीबाबत प्रप्त निवेदने तपासून नियमातील तरतूद व विहित कार्यपध्दतीनुसार त्यावर कार्यवाही केली जाते. सदर कार्यपध्दतीनुसार संपूर्ण राज्यात आतापर्यंत एकूण १३० मद्य अनुज्ञप्त्या बंद करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोटार अपघात दावा न्यायालयाकरीता जागा व निधी उपलब्ध करणेबाबत**

**(४२) ५०८४२ (२८-०४-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरामध्ये मोटार अपघात दावा न्यायालयाकरीता जागा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरामध्ये मोटार अपघात दावा न्यायालयात विविध माळयावर वेगवेगळया ठिकाणी जिल्हा सत्र न्यायालयात विस्कळीत रूपात सुरू आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशी अंती मा.लोकप्रतिनिधींनी मोटार अपघात दावा न्यायालयात जागा व निधी उपलब्ध करणेबाबत केलेल्या विनंतीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१६)** :(१) व(२) सर्व चार मोटार अपघात दावा न्यायाधिकरणे दुसऱ्या माळयावर कार्यरत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, नागपूर यांना नवीन जागा उपलब्ध करुन देण्याची बाब कार्यवाही खाली आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी, नागपूर यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कृषि सहायकांच्या विविध प्रलंबित मागण्याबाबत**

**(४३) ५२४३८ (२८-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषि सहायकांच्या विविध प्रलंबित मागण्याबाबत दिनांक १ मे, २०१६ रोजीच्या सुमारास मा.कृषि राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.अप्पर मुख्य सचिव, कृषि, मा.आयुक्त कृषि, पुणे यांना महाराष्ट्र राज्य कृषि सहायक संघटना यांनी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनात कोणकोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत व त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, निर्णयाअंती राज्यातील कृषि सहायकांच्या विविध प्रलंबित मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०७-२०१६)** :(१), (२) व (३) कृषी सहाय्यकांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात दिनांक १७.०२.२०१६ राजी बैठक झाली. त्यामध्ये प्रामुख्याने तदर्थ पदोन्नती देणे, आश्वासित प्रगती योजनेनुसार पहिला व दुसरा लाभ मिळणे, कृषी सेवक पदावरील ३ वर्षाचा कालावधी सेवा ज्येष्ठतेसाठी ग्राह्य धरणे, कायम प्रवास भत्त्यामध्ये वाढ करणे, कृषी निविष्ठा वाटपासंबंधीच्या परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी होणे अशा प्रकारच्या मागण्या होत्या. प्रस्तुत मागण्यांबाबत बैठकीत झालेल्या चर्चेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे ब्राम्हणशेवगे (ता.चाळीसगांव, जि.जळगांव) डोण मार्गे वळविण्यात आलेली हिरापूर मार्ग वळविण्याबाबत**

**(४४) ५२४९७ (२८-०४-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ब्राम्हणशेवगे (ता.चाळीसगांव, जि.जळगांव) डोण मार्गे वळविण्यात आलेली हिरापूर मार्गे करण्याची मागणी चाळीसगाव आगार प्रमुखाकडे लोकसंघर्ष मोर्चाद्वारे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) होय.

(२) चाळीसगांव-ब्राम्हशेवगे मार्गे हिरापूर फेरी मागणीप्रमाणे दि.१७.०२.२०१६ पासून ०८.३०, १०.३० व १६.३० या वेळेस सुरु करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संजय फर्टिलायझर्स परतूर यांनी उत्तम इमक्सी हे मुदत संपलेले किटकनाशक दिल्याबाबत**

**(४५) ५२५६५ (२८-०४-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.राधाकिशन बरडे, रा.देवला (ता.परतुर, जि.जालना) या शेतकऱ्याला संजय फर्टिलायझर्स परतूर यांनी उत्तम इमक्सी हे मुदत संपलेले किटकनाशक दिल्या प्रकरणी दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.कृषि मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीनुसार संबंधित दुकानदारांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उक्त दुकानदार संजय फर्टिनायझर्स परतूर यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

मुदतबाहय किटकनाशके फवारल्यामुळे “आले” या पिकाचे नुकसान झालेले असून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी तक्रारीत करण्यात आलेली आहे.

(२) होय.

(३) उक्त तक्रारीच्या अनुषंगाने तालुका स्तरीय तक्रार निवारण समितीने क्षेत्रीय भेट देऊन केलेल्या तपासणीत किटकनाशक फवारल्यामुळे “आले” या पिकाचे नुकसान झाल्याचे आढळुन

आलले नाही. तथापि विक्री केंद्राच्या तपासणीत काही त्रुटी आढळून आल्याने संजय फर्टिलायझर्स एजन्सी, परतूर यांचा परवाना दि.१६/०१/२०१६ ते दि.३०/०४/२०१६ या कालावधीसाठी निलंबित करण्यात आलेला होता.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील कोरडवाहू शेतीसाठी कोरडवाहू शेती अभियानासाठी कोणतीही आर्थिक तरतूद नसणेबाबत

**(४६) ५२६७९ (२८-०४-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील कोरडवाहू शेतक-यांच्या जीवनमानात बदल व्हावा म्हणून मागच्या तीन वर्षापासून जिल्ह्यात कोरडवाहू शेती अभियान राबविण्यात येते मात्र या वर्षी या अभियानासाठी कोणताही निधी शासनाने दिलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अभियानातून २०१५-१६ मध्ये काही काम झालेले नाही तरी या अभियानासाठी ६ कोटी ५६ लक्ष रुपयांचा निधीसाठी आराखडा शासनाकडे सादर केलेला असून यासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत वर्षीचे शेतक-याचे ८७ लाख रुपये शासनाकडे थकित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोरडवाहू अभियानासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
बीड जिल्ह्यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये कोरडवाहू शेती अभियानासाठी रु.३४४.७० लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(२) हे खरे नाही.
सन २०१५-१६ मध्ये बीड जिल्ह्यासाठी या अभियानांतर्गत रु.३४४.७० लाख तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली असून आराखड्यानुसार रु.२४३.५२ लाख रक्कमेची कामे पूर्ण करुन त्यानुसार खर्च करण्यात आलेला आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
सन २०१५-१६ मध्ये रु.३४४.७० लाख निधी शासनाने उपलब्ध करुन दिला असून, सदर अनुदानातुनच मागील वर्षातील कामाचे थकित अनुदान रु.४७.२६ लाख अदा करण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी विद्यापीठ कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना तात्काळ लागू करण्याबाबत

**(४७) ५२७४० (२८-०४-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय कर्मचारी व पारंपारिक अकृषि विद्यापीठ सेवेतील कर्मचाऱ्यांप्रमाणे कृषी विद्यापीठ सेवेतील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्रनागरी सेवेमधील नियम व सेवा शर्ती जशास तशा लागू असल्याने कालबध्द पदोन्नती योजना कृषि, पदुम विभागाच्या आदेशानुसार १९९४ पासून लागू होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कालबध्द पदोन्नती योजनेचे रुपांतर सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेमध्ये शासनाचे आदेशान्वये करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना राज्यातील सर्व शासकीय,कर्मचारी, पारंपारिक विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आली असतांना ही योजना कृषि विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती सदर सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना कृषी विद्यापीठ कर्मचाऱ्यांना तात्काळ लागू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही वित्त विभागाच्या स्तरावर सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी सहाय्यकांच्या प्रलंबित मागण्याबाबत

**(४८) ५२७८८ (२८-०४-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी सहाय्यकांना शासन निर्णय वित्त विभाग दिनांक १ एप्रिल, २०१० प्रमाणे १२ वर्षाच्या सेवेनंतर पहिली व २४ वर्षाच्या सेवेनंतर दुसरी कालबध्द पदोन्नती लागू करणेबाबत मॅट, मुंबई यांनी कृषी सहाय्यकांच्या बाजूने निकाल दिला असतांना आज पर्यंत त्याचा लाभ कृषी सहाय्यकांना देण्यात न आल्याची बाब निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशी अंती उक्त लाभ कृषी सहाय्यकांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०७-२०१६)** :(१), (२) व (३) राज्यातील कृषी सहाय्यकांना १२ वर्षाच्या सेवेनंतर पहिली व २४ वर्षाच्या सेवेनंतर दुसरी कालबध्द पदोन्नती लागू करणे बाबतचे प्रकरण सद्य:स्थितीत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जळगांव आगारात नवीन बसेस पुरविण्याबाबत

**(४९) ५२८३१ (२८-०४-२०१६). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव आगारात उत्पन्न वाढीकरिता शहराच्या मध्यवर्ती जागेवर असलेल्या जुन्या बसस्थानकांवरुन तालुक्यातील काही मार्गावर भंगार अवस्थेतील बसेस सोडण्यात येत असल्याने प्रवाशांचे हाल होत असल्याची तक्रार संबंधित अधिका-यांकडे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती जळगांव आगारात नवीन बसेस पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) नाही.
(२) व (३) जळगांव आगारातील गेल्या तीन वर्षात एकूण २३ बसेस मोडीत काढण्यात आलेल्या असून ३४ नवीन बसेस आगारास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बीड जिल्ह्यातील कृषी कार्यालयातील कर्मचारी-अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

**(५०) ५३२८८ (२८-०४-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील कृषी कार्यालयांत कर्मचारी-अधिकाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्याची बाब माहे मार्च, २०१६ च्या पहिल्या सप्ताहत वा त्या सुमारास निदर्शनास आली अहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यातील कृषी कार्यालयांतील सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०७-२०१६) :**(१) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड व अधिनस्त कार्यालयातील मार्च, २०१६ अखेर मंजूर ८८३ पदांपैकी २५६ पदे रिक्त आहेत.
(२) गट अ संवर्गातील पदे भरलेली आहेत. गट ब (कनिष्ठ) संवर्गातील पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागाणीपत्र पाठविण्यात आले आहे.

गट-क संवर्गातील कृषी सेवकांची पदे भरण्याकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. गट ड संवर्गातील पदांबाबत जिल्हा स्तरावर पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.